ISSN : 2278-8204

INTERNATIONAL MONTHLY RESEARCH JOURNAL FOR ALL SUBJECT

# AKSHARDEEP

Year - V
August - 2016

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

Editor
Dr. Ganesh Lahane

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Moods and Manifestations of Nature in Bond's "The Room on the Roof" | Miss. Nayana D. Barde | 01 |
| 2. | दलित साहित्य की अवधारणा और स्वरूप | डॉ. गजानन बने | 05 |
| 3. | बंजारा समाज आणि कृषी संस्कृती | डॉ. लक्ष्मण पवार | 07 |
| 4. | अनुसूचित जमातीच्या प्राथमिक शिक्षणाच्या गळतीची स्थिती आणि समस्या. (विशेष संदर्भ - चंद्रपूर जिल्हा) | हितेश दडमल | 11 |
| 5. | महाराष्ट्रातील शहरीकरण प्रवृत्ती संतुलित विकासापुढचे आव्हान | डॉ. जयंतकुमार मस्के | 17 |
| 6. | भारतातील उद्योजकता विकास कार्यक्रम व महिला उद्योजक | श्री. मदन प्रधान | 21 |
| 7. | भारतातील स्त्री विषयक समस्या आणि उपाययोजना | डॉ. राजेंद्र बेलोकर | 24 |
| 8. | स्वामी विवेकानंद यांचा धार्मिक राष्ट्रवाद आणि आजचा धर्मनिरपेक्षवाद | डॉ. श्रीकृष्ण मुंडे | 27 |
| 9. | महात्मा गांधी तंटा मुक्त ग्राम अभियान आणि सामाजिक विकास | प्रा. नंदा लिमकर | 30 |
| 10. | विधवा पुनर्विवाह चळवळीत पंडीत विष्णूपरशुराम शास्त्री यांचे योगदान | प्रा. संदीप मिरे | 36 |
| 11. | इ. स. १९१९ चा कायदा आणि स्वतंत्र मतदारसंधात जातीयवादाचा केलेला विकास | प्रा. संतोष इंगोले | 43 |
| 12. | आंध आदिवासी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ - मौजे नरवाडी ता. कळमनुरी जि. हिंगोली | प्रा. आर. व्ही नवगणकर<br>डॉ. व्ही. ए. मलवाडे | 48 |


Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

Research Paper
In
Marathi

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep

7
ISSN 2278-8204
Vol V. Issue : I,
August, 2016

# बंजारा समाज आणि कृषी संस्कृती

डॉ. लक्ष्मण पवार
मराठी विभाग
हुतात्मा जयवंतराव पाटील
महाविद्यालय, हिमायतनगर

भारतीय संस्कृती ही प्राचीन संस्कृती आहे. आर्य येण्यापूर्वी भारतात आर्येत्तर म्हणजे द्रवीड लोक या देशात राहत होते. परंतु आर्यांच्या आगमनाने त्यांना आपले मुळस्थान सोडून इतरत्र भटकावे लागले. भारतीय मुळ लोक हे द्रवीड होते. जे आता विमुक्त भटके म्हणून ओळखले जातात. हे नग्न सत्य आहे. परंतु या सत्याला भारतीय वर्णव्यवस्था आज मानायलाही तयार नाही. याचे मुळ कारण त्यांचा अहंकार आर्य आज्ञानात लपलेले आहे.

भारताचे मुळ रहिवाशी हे मागासवर्गीयच आहेत असे जर एकमत झाले तर आज मागासवर्गीयांचा दैनंदिन जीवनाचा प्रश्न सहज सुटेल. परंतु काही प्रस्थापीत लोकांनी आपला दबदबा कायम टिकविण्यासाठी आजही ते द्रवीड आहेत मानायला तयार नाहीत. स्वतःच्या स्वार्थासाठी बाहेरून आलेल्या आर्य लोकांच्या मदतीने आपल्याच माणसांवर आक्रमण करून त्यांना उध्वस्त केले. त्यांची जीवनशैली बंदिस्त करून टाकली. त्यांना जगण्यासाठी संघर्ष करायला लावले. परिणामी स्वतःचे उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांना आपली सुजलाम सुफलाम भुमी सोडून रानावनात भटकावे लागले. त्याचा परिणाम म्हणून ते दऱ्याखोऱ्यात, जंगलात विखुरले गेले आणि त्यांच्या शेतीवर आर्य शेती कसु लागले. परंतु निसर्ग नियमाप्रमाणे जरी एक मार्ग बंद झाला तर दुसरा मार्ग सुरु होतो. त्याप्रमाणे त्यांची मुळ शेती करु लागले. म्हणूनच आज भटक्या प्रवाहातील बंजारा समाजाची शेती ही जंगलाच्या जवळ आहे.

भटक्या समाजात हा देशाचा खरा मालक, मुळ रहिवाशी परंतु आर्यांनी त्यांना गुलाम केले हेच आपले शत्रू आहेत. असे समजून त्यांच्याशी संघर्ष चालू ठेवला. परंतु त्यांच्याकडे आर्या विरुद्ध लढण्यासाठी फारशी साधने नव्हती म्हणून त्यांना जंगलात डोंगराचा आश्रय घ्यावा लागला. भटक्या समाजातील बंजारा समाज हा शेती व्यवसायात स्थिर झाला परंतु निसर्गासोबत जर टिकायचे असेल तर उपलब्ध निसर्गातील साधन संपत्तीचा उपयोग जीवनात केल्याशिवाय आपण जीवंत राहू शकत नाही ही कल्पना त्यांच्या मनात आली तेंव्हा पासून ते शेतीला पूरक व्यवसाय म्हणून आपल्याजवळ गाय, बैल, शेळी, कोंबडी इत्यादी प्राण्यांची संख्या वाढवली परिणामी ती आज कृषी संस्कृतीबरोबर प्राणी संस्कृतीमध्येही पारंगत झालेला पहावयास मिळतो. म्हणूनच आज त्यांच्याकडे सर्वात अधिक गायी, बैलांची संख्या आहे.

पुर्वीच्या काळी तो निजाम, मोगल सरकारच्या सैन्याला धान्य पुरवठा करण्याचे काम करीत. परंतु इंग्रजांच्या आगमनाबरोबर भारतात रेल्वे आली. त्यामुळे त्यांचा पारंपरिक व्यापार धंदा बंद झाला. तो आपल्या उपजिविकेसाठी शेती करु लागला व तेथेच स्थिरावला अशा बंजारा समाजाने शेती व्यवसाय उत्तम पद्धतीने करतो आहे.

कृषी संस्कृतीत मानवाच्या वाटचालीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जातो. ज्या काळात माणसाचे भटकेपण थांबले व तो शेती करु लागला व शेती करण्यासाठी तो एका विशिष्ट जागी वस्ती करु लागला. एकत्र राहू लागला. जमिनीची मशागत करून, धान्य पेरून पीके घेण्याच्या या प्रक्रियेत त्यांना एका ठिकाणी राहणे भाग पडले. त्यामुळे सहाजीकच जंगलाच्या सानिध्यात असलेल्या माणसांनी आपल्या निवाऱ्याची सोय उपलब्ध साधनांमधून केली आहे. धान्य साठविण्यासाठी कणग्या, गुरे बांधण्यासाठी गोठा, अवजारे तयार

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

ISSN 2278-8204
Vol.V. Issue : I,
August, 2016

करण्यासाठी हत्यारे यांची गरज निर्माण झाली या संपूर्ण प्रक्रियेत तो नवनवीन तंत्र कौशल्य अवगत केली. म्हणूनच आजही वेरुळ, अजींठा अशा डोंगर दऱ्यात पाषाणशिल्पे पाहावयास मिळतात. त्या पाषाणावर शिल्पकला कोरलेली पाहावयास मिळते. त्यावर प्राणी व उपयुक्त अवजाराचेही चित्र पाहावयास मिळतात.


संस्कृतीच्या या टप्प्यावर देव संकल्पनेचाही त्यांच्यात विकास झालेला आहे. आदिम काळापासून ज्याची शिकार करायची त्यांची प्रतिमा रेखाटली गेली. त्यातून वाघाची, सापाची देवप्रतिमा निर्माण झाली. ज्याच्यापासून भय आहे अशा पंचमहाभूतांना तो देव मानू लागला. या सर्व संकल्पनाची त्याने कृषी संस्कृतीच्या काळात अनेक देवी-देवता निर्माण केलेल्या आहेत. यामुळे त्यांच्यात शिल्पकला विकसीत होऊ लागली. कालांतराने ती विकसीत झालेली आहे. म्हणूनच आज अनेक देवी-देवतांचे शिल्परूप आपण पाहतो आहे.

बंजारा समाजाचा पारंपरिक लेणी व्यवसाय बुडाला. त्यांच्यावर आक्रमणे झालीत. त्यामुळे तो रानावनात विखुरला अशातच मिळेल ते खाणे फावल्या वेळेत शिकार करणे आणि पोट भरणे हे त्यांचे दैनंदिन चक्र चालू झाले. म्हणूनच तो आपल्या अन्नासाठी जाणीवपूर्वक शिकार करु लागला. ही बंजारा संस्कृतीची सुरुवातीची अवस्था आहे. शिकार करण्यासाठी दगडाला आकार देऊन हत्यारे तयार केली, लाकडाच्या फांदीचा उपयोग भात्यासारखा फेकून मारण्यासाठी केला. कधी-कधी तर त्यांनी प्राण्यांच्या हाडाचा, दाताचाही हत्यार म्हणून वापर केलेला पाहावयास मिळतो. त्यामुळे त्यांची हत्यारे तयार करण्याची कल्पकता व विविधता आपल्याला दिसून येते.

*** बंजारा समाज आणि शेती :** भारत हा कृषी प्रधान देश आहे. सुमारे ७०% लोक शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे उपजिविकेचे प्रमुख साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते. परंतु शेती ही अस्मानी आणि सुलतानी या दुष्टचक्रात सापडलेली असल्यामुळे आज शेती ही बेभरवशाची झाली. परिणामी शेती कसणारा शेतकरी आत्महत्या करतांना दिसतो आहे. जर शेती पिकलीच तर शेतमालाला भाव मिळत नाही. कधी-कधी निसर्गाचा कोप होतो सुरुवातीला पाऊस चांगला पडतो शेतीतील पीके वाऱ्याबरोबर डोलू लागतात. या दृश्याकडे पाहून शेतकरी आनंदी होतो. शेतात पिक वाढू लागते तसं शेतकऱ्यांचे मनही मोठे होऊ लागते. परंतु शेवटी तो आस्मानी संकटात अडकतोच पानाकडे पाहून शेतकरी मनातील सर्व विचार चारचौघात व्यक्त करतो, तो म्हणतो यावर्षी माझ्या शेतात भरपूर उत्पन्न मिळणार मला काही कमी नाही, मी काही इतरांपेक्षा कमी नाही म्हणून स्वाभिमान व अहंकार हे दोन्ही गुण बरोबरीने वाढत असतात. परंतु काहींची शेती ही वाळून जाते तर काहींचे बऱ्यापैकी उत्पन्न मिळते. परंतु सरकारच्या भावामुळे त्याच्या पदरी निराशा पडते. शेवटी हतबल होऊन आपल्या नशीबालाच दोष द्यायला निघतो तो म्हणतो, ''काय करु आमच्या नशिबातचं असं जगणं आलेले आहे.'' म्हणून आजचा शेतकरी काही करून आपल्या शेतीत आपल्या मुलांना शेती करु देत नाही तो म्हणतो, ''बाबा शेतीच्या नादी लागू नये, आमच्याबरोबर पसाभर माती खाऊ नको, शाळा शिकं, मोठ सायेब हो नाही तर, आमच्या सारखच हलाखीचं, कर्जबाजारीच जीवन जगाव लागेल बाबा. आम्ही सर्व उन-पावसात सुकून गेलो पण तुझं जीवन असं आम्ही पाहणार नाही. काही कर पण शेती करु नको.'' अशी केवीलवाणी याचना कृषी प्रधान देशात शेतकरी करतो आहे. ज्यावर्षी नापीकी होईल त्यावर्षी आत्महत्या वाढते.

परंतु अवलोकनार्थी असे दिसून येते की, बंजारा समाज निसर्गाकडे पाहून जीवन व्यथित करणारा असल्यामुळे निसर्ग ज्याप्रमाणे कलेकलेने वाढतो त्याप्रमाणे तो आपले जीवन जगतो आहे. म्हणूनच तो उपलब्ध साधनांचा वापर करून आपली उपजिवीका करतो. त्यात त्याला अपमान वाटत नाही. तो शेतीला पर्यायी मार्ग शोधतो म्हणूनच बंजारात आत्महत्येचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यांच्या मते, ''देव-करचं जको आचो करचं'' असे ते म्हणतात. म्हणूनच आजही तो जुन्या चालीरिती, रुढी, परंपरा अंधश्रद्धा यात अडकलेला आहे.

**कृषी संस्कृतीत प्राण्यांची भुमिका :** बंजारा समाज पशुपालक आहे. त्यांच्या मते पशु म्हणजे धन आहे. ज्यांच्याकडे गायी-बैल, शेळी इत्यादी प्राण्यांची संख्या अधिक तो सर्वात श्रीमंत असे आजही मानले जाते. म्हणून



ISSN 2278-8204
Vol.V, Issue : I,
August, 2016

बंजारा समाज एकमेकांच्या चढाओढीने गायी-बैल व शेती उपयुक्त प्राणी पाळतो. त्या प्राण्याच्या शेणापासून तो आपली शेती पिकवितो. त्यांच्या मते, ''शेती जर पिकवायची असेल तर, शेतात ढोरं बांधलीच पाहीजे. शेणखत टाकलचं पाहीजे. जर शेतात ढोरं बांधली नाही, शेणखत टाकल नाही तर शेती करून काहीचं उपयोग होत नाही. कारण जोपर्यंत शेतात मलमूत्र पडत नाही तोपर्यंत शेती सुजलाम-सुफलाम होत नाही.'' असा पक्का विश्वास असल्यामुळे आज बंजारा समाजाच्या अंगणा-अंगणात ढोरं दिसतात. इतर समाजाच्या अंगणात आज अंगण सारवायलाही शेण मिळत नाही. परिणाम म्हणून त्याच्या शेतावर होतांना दिसतो.

या समाजात शेतीला आई मानतात. म्हणून हा समाज शेतीत अहोरात्र कष्ट करतो. त्यांच्या ऐवढे कष्ट इतर समाज करतांना दिसत नाही. म्हणून आज तांड्यात सर्वत्र संपन्न लोक दिसून येतात. नित्यनियमाने शेतात जागल करणे, जागलीवर बैलाला खायला रात्रीतून तीन वेळा टाकणे आणि शक्यतो बैलांनीच शेतीची मशागत करणे हा उपक्रम त्यांचा आहे. त्यांच्या मते ''कामातच राम आहे.'' म्हणून आपलं सर्वस्व कामात झोकून देतात.

आपल्या शेतातील कामासाठी बैल लागतो म्हणून त्यांना वाटते आपण गरीब आहोत. मोठे बैल विकत घेऊ शकत नाही म्हणून ते एक तरी गाय पोसतात. त्या गायीपासून त्यांना वासरु मिळते त्या वासराला सोबत चारून लवकर मोठे करतात आणि त्यांना काम लावतात. बैलाच्या मेहनतीमुळेच आपण शेती करु शकतो. त्यांच्यामुळेच आपल्याला खायला मिळते तो आपला सांभाळ करतो. अशी विचारधारा असल्यामुळे ते त्यांची तुलना बापाबरोबर करतात. ते म्हणतात, ''गाय माय बैल बाप म्हशीला झवलं तर काही नाही पाप.'' अशी श्रद्धा असल्यामुळे गायी-बैलांची सोय ते आपल्या आई वडीलांप्रमाणे करतात. शेतात राबणारे बैल म्हातारे झाले तर त्या बैलाला खाटकाला विकत नाहीत ज्या बैलाने आपल्याला मोठ केल, शेतात राबला त्या बैलाला विकले तर आपल्याला नरकात जावे लागेल. या विचारामुळे ते गायी-बैलाला विकत नसायचे. परंतु आज इतर धर्माच्या लोकांच्या संपर्कात आल्यामुळे ते ज्या बैलावर प्रेम केले त्या बैलाला विकत आहेत. परिणामी इतर समाजासारखीच त्यांची परिस्थिती आज झालेली आहे. त्यांच्या अंगणात शेणाच्या जागी सिमेंट आले आणि गायी-बैलाचे अस्तित्व संपले त्यामुळे रानोमाळ भटकून गायी-बैल चारणारा बंजारा समाज आज गायी-बैलापासून दूर गेला. याचा परिणाम त्यांच्या शेतीवर झाला. पाहिजे तेवढे उत्पन्न मिळत नाही. मग ते रासायनिक शेतीच्या मागे लागले. रासायनिक शेतीचा परिणाम त्यांच्या शरीरावर झाला. म्हणून आज नको असलेले रोग त्यांच्यात आलेले आहेत.

*** शेती उपयुक्त औजारे :** शेतीच्या अवजारांसाठी बंजारा समाज जंगलातील लाकडावर विश्वास ठेवतो. जंगलाच्या सानिध्यात जीवन व्यथित करीत असतांना आपली उपजिवीका करण्यासाठी त्यांनी जंगलातील उपलब्ध साधनांचा वापर केला. त्यामध्ये शिकार करण्यासाठी दगडापासून सुरी, भाले तयार केले. तर उभ्या सरळ लाकडापासून फेकून मारण्यासाठी भाले तयार केले. अशांतूनच त्यांना जंगलातील लाकडाची ओळख झाली. कोणत्या लाकडापासून शेती उपयुक्त अवजारे तयार करता येतील याचा शोध लावला. त्यातूनच खैराचे, सागाचे, बाभळीचे, पळसाचे इत्यादी झाडापासून शेती उपयुक्त अवजारे तयार केली. सागाच्या लाकडापासून वखर तयार केले. त्याच्या दांड्यापासून वासे तयार करून शेती उपयुक्त वखर तयार करून शेतीची मशागत केली. हळदबेरा व बाभळीपासून शेती नांगरणीसाठी नांगर तयार केला. त्या नांगराच्या मदतीने शेतीत नांगरणी केली तीही दोन बैलजोड्याला ओडता येऊ नये अशा नांगरानी अशा अवजारांचा शोध त्यांच्या गरजेतूनच निर्माण झालेला आहे. शेतात रेघोट्या पाडण्यासाठी ''चौसा'' हे अवजार सागाच्या लाकडाचा आहे. या चौसाला 'जू' म्हणून मेरशिंगी या जातीच्या लाकडाचा वापर करतात. तर ज्यावेळेस शेतातला माल घरी आणण्यासाठी काही साधन नव्हते तेंव्हा 'काडवण' या साहित्याचा वापर केला. (काडवण म्हणजे दोन बेळ्या व त्यावर जू) असा आहे. त्यानंतर कालांतराने त्यांनी बैलगाडी, छकडा यांचा शोध लावून त्याचा योग्य वापर आपल्या दैनंदिन

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.V. Issue : I,
August, 2016

जीवनात करु घेतला आहे. म्हणून आज तांड्यातांड्यात प्रत्येक घरासमोर बैलगाडी उभी असतेच. पुर्वीच्या काळी ज्यांच्याकडे बैलगाडी आहे तो शेतकरी तांड्यात मोठा असा समज होता. बैलगाडी असणे म्हणजे तो व्यक्ती प्रतिष्ठित, ज्यांच्या घरी बैलगाडी नाही तो गरीब असे समजले जात असे. म्हणून आज तांड्यातील प्रत्येक बंजारा काही करेल, शेती, गायी, शेळ्या विकतील परंतु बैलजोड घेईल. परंतु आज इतर समाजाच्या संपर्काने तसा राहण्याच्या प्रयत्नात आपल सर्वस्व गमावण्याच्या वाटेवर आहे. शेतीची राखण करण्यासाठी तो रात्रभर जागता पाहरा देतो. रानटी जनावरांपासून आपल्या शेतीचे रक्षण व्हावे यासाठी तार कुंपणाच्या जागी तो बोरी, चिव्हाटी, या काटेरी झुडपांचा वापर करतो. असे अहोरात्र काबाडकष्ट करून आपल्या रक्ताच पाणी करणाऱ्या शेतकऱ्यावर मात्र आज उपासमारीची वेळ यावी हे दुर्दैव आहे.

अर्थात बंजारा समाजातील शेतकऱ्याच्या कृषी संस्कृतीचा विचार करतांना एकच कळते की ते या कृषी संस्कृतीसाठी आपल्या जीवाची पर्वा न करता जंगलातील उपलब्ध साधनांचा वापर करून आपली ही संस्कृती जीवंत ठेवतो. जर इतर समाजानेही बंजारा कृषी संस्कृतीचा आदर्श घेऊन गायी-बैलांवर प्रेम केले आणि त्यांच्या मदतीने शेती केली तर नक्कीच आत्महत्येची वेळ येणार नाही आणि उध्वस्त होत चाललेली ही कृषी संस्कृती निश्चितच आपल्याला सुजलाम-सुफलाम बनवेल.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. लक्ष्मण पवार, बंजारा : समाज, संस्कृती आणि स्त्री.
२) डॉ. यशवंत जाधव, बंजारा जनजाति का इतिहास.
३) बळीराम पाटील, बंजारा लोकांचा इतिहास.
४) डॉ. गणपत राठोड, बंजारा लोकगीतों का सांस्कृतीक अध्ययन.
५) प्रा..मोतीराम राठोड, गुन्हेगारी एक्स जमाती.

Asstt. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded